रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक १५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ शनिवार, १ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## महिला सक्षमीकरण योजनेसाठी समिती स्थापन



**मुंबई :** राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूल विभागाने उच्चस्तरीय राज्यस्तरीय समिती स्थापन केली आहे. शासकीय पड जमिनी भाडेपट्ट्याने देऊन त्यावर चारा व बांबू लागवडीच्या धोरणावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी या समितीकडे असणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी (दि.३१) जारी करण्यात आला. महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीत विधानसभा आणि विधान परिषदेतील ११ महिला आमदार तसेच प्रत्येक महसुली विभागातून दोन अशासकीय महिला सदस्यांचा समावेश असेल. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. शासकीय पड जमिनींचा प्रभावी वापर करून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

अंतरंग
वरसोलीत पोलिसांचा छापा; ड्रग्जसह एक जण ताब्यात/२
पनवेलमध्ये गुंजला 'अंतर्नाद'; रसिक प्रेक्षकांचा प्रतिसाद/६
लव्हप्रीत सिंगने रौप्यपदक जिंकले; सीमाला 'कांस्य'/८

# जनतेची कामे करून भाजप संघटन मजबूत करा -मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**अलिबाग : प्रतिनिधी**

कार्यकर्ता म्हणून जनतेची कामे करा आणि केलेली कामे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवून भाजपचे संघटन मजबूत करा, असे आवाहन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि.३१) अलिबाग येथे बोलताना केले.

छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान कार्यक्रमासाठी महसूलमंत्री बावनकुळे दोन दिवस अलिबागच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. त्यानंतर कुरूळ येथील माळी समाज हॉलमध्ये आयोजित बैठकीत त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमात महसूलमंत्र्यांनी कार्यकर्त्यांची निवेदनेही स्वीकारली.

### अलिबाग येथे कार्यकर्त्यांशी साधला संवाद

यावेळी भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, आमदार प्रमोद जठार, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी खासदार धैर्यशील पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, भाजप कोकण विभाग प्रसिद्धिप्रमुख सतीश धारप, दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, रायगड जिल्हा परिषदेचे कृषी सभापती वैकुंठ पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील आदी उपस्थित होते.

'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकार हे महाराष्ट्रातील आतापर्यंतचे सर्वांत मजबूत सरकार आहे. या सरकारने जनतेच्या भल्यासाठी ६५ निर्णय घेतले आहेत. शासकीय जमिनीवरील घरे अधिकृत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ३३ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी केली आहे. वीज बिले माफ केली आहेत. पाणंद रस्ते मजबूत केले जाणार आहेत. पुढील पाच वर्षांत रायगड जिल्ह्यातील तीन हजार ९५० पाणंद रस्ते पक्के केले जाणार आहेत. रस्त्यांचे मॅपिंग केले जाणार आहे. याची माहिती कार्यकर्त्यांनी जनेतपर्यंत पोहचवली पाहिजे,' असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

लोकांना भेटा. त्यांच्या समस्या काय आहेत त्या जाणून घ्या. त्यांची निवेदने मंत्र्यांकडे द्या. कामे करून घ्या. समस्या शोधून त्या सोडवण्याचा प्रयत्न करा. एखादी अशी समस्या आणा ज्यामुळे नवीन कायदा करून जनतेचे जीवन सुलभ करता येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी जनतेचे जीवन सुलभ करण्यासाठी सरकार आपले काम करते. कायदे बनवते. योजना तयार करते. सरकारने केलेली कामे जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले पाहिजे, तेव्हा पक्ष संघटनदेखील मजबूत होईल, असे म्हटले. सूत्रसंचालन ॲड. महेश मोहिते यांनी केले.

औद्योगिक वापराविना पडून असलेल्या जमिनी होणार शासनजमा!/२

# भिवंडीत इमारत कोसळून १० जणांचा दुर्दैवी मृत्यू



**भिवंडी : प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील बालाजीनगर-गंगारामवाडी येथील कोहिनूर अपार्टमेंट ही तळ अधिक चार मजली अतिधोकादायक ठरवलेली इमारत गुरुवारी (दि. ३०) रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास कोसळली. या दुर्घटनेत १० जणांचा मृत्यू झाला आहे.

महापालिकेने ही इमारत यापूर्वीच धोकादायक घोषित केली होती. त्यामुळे बहुतांश रहिवाशांनी इमारत रिकामी केली, मात्र एका कुटुंबाकडून दुरूस्तीचे काम सुरू असताना इमारतीचा मोठा भाग कोसळला आणि कामगारांसह त्या कुटुंबातील सदस्य मलब्याखाली अडकले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, पोलीस प्रशासनासह एनडीआरएफचे पथक, टीडीआरएफ दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. या दुर्घटनेत १० जणांचा मृत्यू झाला असून जखमींवर भिवंडीतील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त करीत तत्काळ एफआयआर नोंदवून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश भिवंडी महापालिका आयुक्तांना दिले आहेत. जखमींवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी शुक्रवारी घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

### आर्थिक मदत जाहीर

भिवंडी दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दु:ख व्यक्त केले आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या नातेवाइकांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. याशिवाय राज्य शासनाच्या वतीने मृतांच्या नातेवाइकांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार असून जखमींवर शासकीय खर्चाने वैद्यकीय उपचार केले जातील.

## पीएम किसान योजनेला पाच वर्षांसाठी मुदतवाढ

**नवी दिल्ली :** देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने पंतप्रधान किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेला पुढील पाच वर्षांसाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे ही योजना आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीतही सुरू राहणार आहे. या योजनेसाठी सरकारने ३.१५ लाख कोटी रुपयांहून अधिक निधीची तरतूद प्रस्तावित केली आहे.



# रोहा पालिकेतील प्रशासन अधिकारी 'गायब' सात महिन्यांत नगराध्यक्षांचीही भेट नाही!

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगरपालिकेच्या शिक्षण विभागाचा कारभार अक्षरशः वाऱ्यावर सोडल्याचा आरोप प्रशासन अधिकारी संतोष परशुराम कंठे यांच्यावर होत असून, त्यांच्या कार्यपद्धतीबाबत शहरात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी पदभार स्वीकारून तब्बल सात महिने उलटूनही प्रशासन अधिकारी कंठे यांनी त्यांची औपचारिक भेट सुद्धा घेतली नसल्याने पालिका वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पालिकेच्या सर्वोच्च लोकप्रतिनिधींशी समन्वय नसल्याने शिक्षण विभागाचा कारभार नेमका कोणाच्या निर्देशानुसार चालतो,



असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पालिकेच्या शिक्षकांचे एप्रिल व मे महिन्याचे वेतन अडीच महिन्यांनी जूनमध्ये अदा करण्यात आले. मात्र जून महिन्याचे वेतन अद्यापही प्रलंबित असल्याचा आरोप शिक्षकांनी केला आहे. त्यामुळे विशेषतः सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक अडचणीत सापडल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे, कंठे यांच्या कार्यकाळात नेहरू नगर मराठी शाळा बंद पडल्याची घटना घडल्याने शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रोहा नगरपालिका ही खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रभावक्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मानली जाते. अशा ठिकाणी प्रशासन अधिकारी नगराध्यक्षांनाच भेटत नसतील आणि त्यांच्या कामकाजाबाबत सातत्याने तक्रारी होत असतील, तर त्यांना एवढा आत्मविश्वास नेमका कोणाच्या पाठबळावर मिळतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

अडीच वर्षांपूर्वी कंठे यांनी रोहा नगर पालिकेत प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कार्यकाळातच नवीन शिक्षक भरती तसेच चुकीच्या पद्धतीने बदली आणि समायोजनाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर झाल्याची चर्चा आहे. या प्रक्रियेत नियमांचे पालन झाले नसल्याने याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

त्यामुळे प्रशासन अधिकारी संतोष परशुराम कंठे यांच्या संपूर्ण कार्यकाळाची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, त्यांच्या काळात झालेल्या शिक्षक भरती, बदली-समायोजन, शाळा बंद करण्याचे निर्णय यांची सखोल तपासणी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**कंठे यांनी रोहा नगर पालिका प्रशासन अधिकारी पदाचा कार्यभार सांभाळण्यासाठी असमर्थता व्यक्त केली आहे. तसा वरीष्ठ कार्यालयात पत्रव्यवहार केला आहे. जून महिन्याचे शिक्षकांचे वेतन आजच झालेले आहे . त्याच्याकडे मुरुड व मुंबईत असल्याने त्यांना त्रास होतंय.**

**-अजय कुमार एडके, मुख्याधिकारी**

# कृषी शिक्षण महासंचालक राहुल महिवाल यांची कर्जत संशोधन केंद्राला भेट

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे महासंचालक राहुल रंजन महिवाल यांनी बुधवारी (दि.२९) रोजी येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या विविध विभागांना भेटी देऊन संशोधनात्मक कार्याचा आढावा घेतला.



सहयोगी संशोधन संचालक डॉ.भरत वाघमोडे यांनी महिवाल यांना प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या भात वाण संग्रहालयातील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित व शिफारशीत केलेल्या विविध सुधारित व संकरित भात जातींची, प्रकाशनांची माहिती दिली. त्यानंतर जलद भात पैदास अंतर्गत प्रयोग,संशोधन, प्रयोग शाळांतील विविध अति उच्च दर्जाच्या उपकरणाची व त्यांच्या निरीक्षणे टिपण्याच्या क्षमतांची इत्यंभूत माहिती दिली असता महासंचालक स्तिमित झाले.

यानिमित्ताने आयोजित आढावा बैठकीत डॉ. वाघमोडे यांनी सर्वप्रथम महिवाल यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि कृषी संशोधन केंद्राच्या कार्यवृत्तांतचे सादरीकरण केले. सभेला संबोधित करताना महिवाल म्हणाले की, शास्त्रज्ञांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. केंद्राने केलेले संशोधन वाखाणण्याजोगे व अभिमानास्पद आहे. संशोधनामुळे देशाच्या भात शेतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करीत केंद्रातील शास्त्रज्ञांच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सहकारामध्ये पतसंस्था ही एक महत्त्वाची व्यवस्था -ॲड. दीपक पटवर्धन

**अलिबाग : प्रतिनिधी**

सहकारामध्ये पतसंस्था ही एक अत्यंत महत्त्वाची व्यवस्था असून ग्रामीण भागापासून शहरापर्यंत पतसंस्थांचे जाळे खेडोपाडी पसरले आहे. त्यामुळे सर्वसामान्य व गरजू नागरिकांना तातडीचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पतसंस्था करत आहेत. पतसंस्थांच्या ठेवींना त्यांच्या वर्गवारीनुसार आवश्यक संरक्षण मिळावे यासाठी राज्य पतसंस्था फेडरेशनकडून आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील तसेच नाममात्र सभासदांना सोनेतारण कर्जवाटप करण्याची तरतूद सहकार कायद्यात दुरुस्ती करण्यात आली असली, तरी या तरतुदीत अधिक व्यवहार्य सुधारणा होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन त्यानंतर मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी केल.



रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित, अलिबाग, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गास आज अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटन समारंभातॲड.दिपक पटवर्धन बोलत होते. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याने ॲड.दीपक पटवर्धन यांचा रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघातर्फे शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ अध्यक्ष ॲड. जे.टी. पाटील यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत संचालक, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने ज्ञान अद्ययावत ठेवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.प्रशिक्षण वर्गाच्या पहिल्या दिवशी सी.ए. पेन्सलवार (पुणे) यांनी टीडीएस, आयकर व जीएसटी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी महासंघाचे संचालक गणेश म्हात्रे, अशोक प्रधान, प्रमोद पाटील, ॲड. के. एस. पाटील, ॲड. अच्युत पाटील, चंद्रशेखर जोशी आणि सौ. उषा चांदगावकर उपस्थित होते. आभार प्रदर्शन महासंघाचे सचिव योगेश मगर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महासंघाचे व्यवस्थापक प्रा. एस. बी. वटाणे यांनी केले.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०७/२६९/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३१/०७/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री./श्रीमती................................
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र.७, शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ०७, दिनांक ०७/०८/२०२६ ची विषयपत्रिका**

**मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :-**

**विषय क्र.१** स्थायी समिती सभा ठराव क्र. १०७, दिनांक ०७/०७/२०२६ अन्वये पनवेल महानगरपालिकेचा आर्थिक वर्ष सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

**महापालिका भवन, पनवेल**
**दिनांक :- ३१/०७/२०२६.**

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०७/२७०/२६

# छत्रपती शिक्षण मंडळाच्या पाच शाळांचा पर्यावरणासाठी प्रेरणादायी पुढाकार; २० हजार सीड बॉलची लागवड

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पाच शाळांनी एकत्र येत पर्यावरण संवर्धनासाठी २० हजार सीड बॉलची लागवड करून एक प्रेरणादायी उपक्रम यशस्वीपणे राबविला. छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड, जय जवान जय किसान विद्यालय वाघेरी, अभिनव ज्ञानमंदिर खुर्द, सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे आणि गोळेगणी हायस्कूल या पाच शाळांनी संयुक्तपणे हा उपक्रम राबवून हरित रायगडच्या संकल्पनेला बळ दिले.



हा उपक्रम माय ग्रीन सोसायटी, अंधेरी व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने पार पडला. वृक्षसंवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या अभियानात रायगड जिल्ह्यातील सर्व सहभागी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून विविध परिसरात २० हजार सीड बॉलचे रोपण करण्यात आले. येत्या पावसाळ्यात या सीड बॉलमधून हजारो वृक्ष उगवून परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमासाठी छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणेतून पर्यावरण संवर्धनाचा हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.पर्यावरण रक्षण ही काळाची गरज असून, विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. "आजचा सीड बॉल म्हणजे उद्याचा विशाल वृक्ष" हा संदेश देत सहभागी शाळांनी पर्यावरण संवर्धनाची सामाजिक जबाबदारी पार पाडली.


## Tender Notice

MAHAVITARAN

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below -

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/ Transportation/ T-07/2026-27 | Annual Contract for Loading & Unloading, transportation of PSC/RSJ poles of all sizes, steel materials, Distribution Transformers, Sub-Station Equipments, Line Material by suitable vehicles under Goregaon Division of Pen Circle | 20.00 | 20,000/- | 2500+ 18%GST = 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 01.08.2026 to Dt. 14.08.2026. Submission of Bid is up to Dt. 15.08.2026 till 17.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Dy. Executive Engineer Tel No. 9029145594. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO No. 082** **Executive Engineer, Goregaon Division**


## अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात

पत्ता : नवीन प्रशासकिय भवन इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०२, पनवेल पिनकोड ४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड.

(Tenancy Mannual, Form VIII)

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**३२. ओ दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/१७/२०२६**

श्री. जनार्दन जयराम म्हात्रे
रा.मु.हरिग्राम, पो. ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार/कुळ

**विरुध्द**

श्री. सदाशिव कृष्णा जोशी
रा.टिळक रोड पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड — सामनेवाले / जमिनमालक

**दावा शेतजमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र.-(सर्व्हे नं./गट नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | हरिग्राम | ५९ | ६ | ०-०७-०० | ०.१६ |

अर्जदार यांनी तहसिलदार पनवेल यांचेकडील कुळ कायदा कलम ७० ब दावा क्र.०९/२०२२, आदेश दिनांक २०/०९/२०२३ अन्वये दावा मिळकतीबाबत महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ओ, प्रमाणे खरेदी किंमत होणेकरीता अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पनवेल याच्या न्यायालयात दिनांक २९/०४/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वार्रस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत दयावयाची असल्यास दिनांक **११/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण पनवेल येथे शेतजमिन न्यायाधिकरणापुढे** हजर होण्याविषयी आपणास (आपल्या विधिज्ञामार्फत) यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे तुम्ही हजर रहाणेस कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक. त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येऊन गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. तसेच सुनावणीचे तारखेनंतर ही नोटीस प्राप्त झालेस आपण ही नोटीस मिळालेनंतर ८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात उपस्थित राहून सुनावणीची तारीख समक्ष घेऊन जावी, या अनुषंगाने फेरनोटीस काढली जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

**ठिकाण :- पनवेल.**
**दिनांक :- २८/०७/२०२६**

**सही/-**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

मौजे पहूर, ता.रोहा, जि. रायगड येथिल......

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.प्रणय रविंद्र सागवेकर | ८६५ | जिरायत ०-३०-०० पो.ख. ०-९०-०० एकुण ०१-२०-०० पैकी ०-२०-० | ०.१६ | खालसा |
| सुमित्रा मारुती वाळंज व इतर | ८६६ | जिरायत ००-४२-०० पो.ख. ००-४०-०० एकुण ००-८२-०० | ०.३३ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (८) आठ दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

**सही/-**
**ॲड.पी.जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला, साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं.९२७२७१३९५६

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतिकारक वासुदेव फडके नाट्यगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ मृत्यू/ई- १२५२९४८/२०२६ दिनांक : ३१/०७ २०२६

**"नोटीस"**

**विषय:- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :- अर्जदार श्री. गणेश शिवराम कानसे, रा. रूम नं. १०१, यशोबाळकृष्ण हौ. सोसायटी, प्लॉट नं.४७, मि. हौ सोसायटी, ता. पनवेल, जि. रायगड यांचा दि. १६/०६/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. गणेश शिवराम कानसे, रा. रूम नं.१०१, यशोबाळकृष्ण हौ. सोसायटी, प्लॉट नं.४७, मि. हौ सोसायटी, ता. पनवेल यांनी त्यांचे वडील कै. शिवराम विश्राम कानसे यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २१/८/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
(सारंग राठोड)
महसूल सहाय्यक,
अप्पर तहसिलदार कार्यकारी, पनवेल

# स्वच्छतेतून स्वयंरोजगाराच्या संधी

## नवी मुंबईत आठ ठिकाणी महिलांसाठी मोफत प्रशिक्षण वर्ग



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या अनुषंगाने 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली ठिकठिकाणी विशेष स्वच्छता मोहिमांप्रमाणेच क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.

या अनुषंगाने गुरुवारी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिला बचत गटांमधील महिलांना उपजीविका आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक विभाग कार्यालय क्षेत्रात एक अशा आठ ठिकाणी झालेल्या या प्रशिक्षण वर्गाचा लाभ महिला बचत गटातील ३८५ महिलांनी घेतला. यामध्ये केंद्रीकृत सुका कचरा प्रक्रिया केंद्र चालविणे, थ्री आर केंद्र चालविणे, ई- कचरा केंद्र चालविणे, जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करणे व पुनर्निर्मिती करणे, प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करणे, फुलांच्या निर्माल्यापासून अगरबत्ती तयार करणे आणि सेंद्रिय खत निर्मिती व बायोगॅस प्रकल्प या विषयांवर रोजागाराभिमुख प्रशिक्षण देण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने महिला बचत गटांमधील महिलांची क्षमता बांधणी करण्यासाठी कौशल्य मल्टिक्रिएशन्स या संस्थेच्या सहकार्याने आठ ठिकाणी आयोजित या मोफत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि समाजविकास विभाग यांनी सहयोगाने केले. महिला बचत गट व अशासकीय संस्था प्रतिनिधींचा सहभाग वाढविण्यासाठी समाजविकास विभागातील समूह संघटकांनी सहकार्य केले तसेच दुर्गा फाउंडेशन यांनीही आयोजनात सहकार्य केले.

स्वच्छ भारत अभियान नागरी २.० च्या अनुषंगाने स्वच्छताकार्यात योगदान देण्यासोबतच महिलांना व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी देणाऱ्या या क्षमतावर्धक उपक्रमाला महिलांचा प्रतिसाद लाभला.

# रिक्षाचोरी करणारा सराईत आरोपी जेरबंद; १२ वाहने हस्तगत



**नवी मुंबई : वार्ताहर**

नवी मुंबई परिसरात सातत्याने घडणाऱ्या रिक्षाचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी मध्यवर्ती गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. सराईत रिक्षाचोराला अटक करून त्याच्याकडून १२ चोरीच्या रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. जप्त रिक्षांची एकूण किंमत सुमारे नऊ लाख ५७ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रशांत कदम शेलके तसेच पोलीस उपायुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वाहनचोरी आणि स्ट्रीट क्राईमविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे यांच्या नेतृत्वाखाली मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय शिंदे यांनी तपास पथक तयार केले. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही व गोपनीय माहितीआधारे आरोपी अनम शिवशंकर पांडे (२२, रा. कोपरखैरणे) याला कोपरखैरणे रेल्वे स्थानक परिसरातून ताब्यात घेण्यात आले.

तपासात आरोपीने मोकळ्या जागेत किंवा पार्किंगमध्ये उभ्या रिक्षांच्या मास्टर चावीचा वापर करून चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून एनआरआय सागरी, खवळे, तुर्भे, कोपरखैरणे, नेरूळ व ठाणे नगर पोलीस ठाण्यांतील १२ रिक्षाचोरीचे गुन्हे उघडकीस आले. ही कारवाई मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि. सतीश भोसले, सपोनि. सचिन कोकरे, पोउपनि. गणेश वाट, पोहवा. अनिल यादव, पोहवा. महेश पाटील, पोना. सचिन बाबर, पोना. शैलेश कांबळे, पोना. अजय कदम, पोना. निलेश केद्रे, पोशि. नवनाथ पाटील यांनी केली.

# सानपाडा येथील मार्केटच्या दुरवस्थेची नगरसेविका शैला पाटील यांच्याकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सानपाडा सेक्टर ४, भूखंड क्रमांक १७ येथील दैनंदिन बाजार मार्केटला गुरुवारी (दि. ३०) 'क'प्रभाग समिती अध्यक्ष व भाजपच्या नगरसेविका शैला जगदीश पाटील यांनी भेट देऊन मार्केटमधील गाळेधारक सभासदांच्या विविध प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी गाळेधारकांनी नगरसेविका शैला पाटील यांना मार्केटमधील शौचालयाची दुरवस्था, अपुरी विद्युत प्रकाश व्यवस्था, बंद पंखे, पावसाळ्यातील छत गळती तसेच इतर मूलभूत सुविधांबाबतच्या समस्या मांडल्या.



नागरिकांनी मांडलेल्या समस्या जाणून घेऊन त्याच्यावर त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात, अशा प्रकारची सूचना नगरसेविका शैला पाटील यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाला दिल्या आहेत. यावेळी समाजसेविका स्नेहा पवार, संगीता मालवे तसेच गाळेधारक व स्थानिक नागरिक उपस्थित होते. नागरिकांच्या सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा करून प्रश्न सोडविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असेही नगरसेविका पाटील यांनी सांगितले.

# ऐरोलीत सहा अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालयांतर्गत नुकतीच १३ अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आली होती. बुधवारीदेखील सहा अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्यात आली.

यामध्ये (१) दीपक आव्हाड, E-३७४, से-२, ऐरोली, (२) देवचंद मढवी, घर क्र. ३००, से-०९, दिवागाव, (३) संतोष सुखदेव प्रसाद, घर क्र- ९५/९७, गल्ली क्र. ५, शिवकॉलनी, से-०१, ऐरोली, (४) शुभम पंडागळे/पानगळे, घर क्र. २६८, २६९, २७०, से- ०२ सी, ऐरोली, (५) राजेश पाटील, घर क्र- ११२,११३, दिवागाव, ऐरोली, (६) जितेंद्र नाईक, घर क्र. २३९, दिवागाव, से-०९, ऐरोली या बांधकामांचा समावेश आहे.

दरम्यान, ॲड. किशोर शेट्टी यांनी कोर्टात दाखल केलेल्या पीआयएल अवमान याचिका सीपी/६८५/२०२५ मध्ये अनधिकृत विनापरवानगी इमारतींची छायाचित्रे सादर केलेली आहेत. या छायाचित्रांमध्ये नमूद अनधिकृत इमारतींना आणि त्याव्यतिरिक्त इतर अनधिकृत बांधकाम सुरू असलेल्या इमारतींना जी ऐरोली विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या होत्या. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

त्या अनुषंगाने महापालिका आयुक्तांच्या २७ जुलै रोजी प्रसिद्ध आवाहनातील आदेशान्वये अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व आठही विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली या तोडक मोहिमेचे आयोजन करून सदर अनधिकृत बांधकामे अंशतः निष्कासित करण्यात आली.

दरम्यान, या धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी- कर्मचारी व २५ मजुरांनी सात ब्रेकर, पाच घण, दोन गॅस कटर, जनरेटर आदी साहित्यासह ही तोडक मोहीम राबविली. यावेळी नमुंमपा अतिक्रमण विभागाकडील पोलीस आणि स्थानिक पोलीस मोठ्या संख्येने तैनात होते. न्यायालयाच्या आदेशानुसार अशा तोडक कारवाया सर्वच ठिकाणच्या अनधिकृत बांधकामांवर करण्यात येणार आहेत.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात जिल्हास्तरीय बालसुरक्षा आणि वाहतूकविषयक बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथील संवाद हॉलमध्ये जिल्हास्तरीय बाल सुरक्षा व वाहतूकविषयक बैठक उत्साहात झाली. या बैठकीस पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) राहुल खाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) गावडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

बैठकीस नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शाळा प्रतिनिधी, शालेय बस मालक, स्कूल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत सविस्तर मार्गदर्शन करत शालेय वाहनांमध्ये VLTT (GPS) प्रणाली अनिवार्य करणे, अग्निसुरक्षा नियमांचे पालन, डिजिटल उपस्थिती प्रणाली, सीसीटीव्ही फुटेज किमान तीन महिने जतन करणे, नियमित विद्यार्थीपालक बैठकांचे आयोजन, शालेय वाहनांच्या भाडे निश्चितीचा अधिकार, चालकांचे मेडिकल फिटनेस प्रमाणपत्र, सहा वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी महिला अटेंडंटची नियुक्ती तसेच प्रत्येक चालकाने दरवर्षी पोलीस क्लिअरन्स सर्टिफिकेट सादर करणे आदी महत्त्वाच्या बाबींची माहिती दिली.



कार्यक्रमात पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे तसेच पोलीस उपायुक्त (वाहतूक) राहुल खाडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. शाळा प्रशासन, शालेय वाहन चालक, ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स व पालक यांनी शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेत कोणतीही तडजोड होऊ देऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पोलीस, परिवहन विभाग, शाळा प्रशासन, वाहन मालक व पालक यांच्या समन्वयातून सुरक्षित, शिस्तबद्ध व अपघातमुक्त शालेय वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याचे आवाहनही करण्यात आले.

बैठकीदरम्यान पनवेल शहर वाहतूक शाखेने विविध अपघातांमध्ये जखमींना तातडीने मदत करून प्राण वाचविणे तसेच नागरिकाभिमुख सेवा बजावल्याबद्दल पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील व त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत अधिकारी व अंमलदारांचा पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे व सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पनवेल शहर वाहतूक शाखेच्या उल्लेखनीय कार्याचे विशेष कौतुक केले.

# मानवता फाउंडेशनतर्फे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना छत्रीवाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

सामाजिक बांधिलकी जपत मानवता फाउंडेशनच्या वतीने सोमजाई शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, पाच्छापूर (ता. सुधागड) येथील गरजू विद्यार्थ्यांना छत्रीवाटप करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवास सुलभ व्हावा आणि त्यांना आवश्यक मदत मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी मानवता फाउंडेशनचे अध्यक्ष संजय पवार, उपाध्यक्ष विनोद नायर, सचिव विघ्नेश मगानी, संस्थेचे ट्रस्टी दीपक घोसाळकर, विशाल बाबर तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी शालेय आवारात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षण आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. दरम्यान, समाजसेवेबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीदेखील प्रत्येकाने स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करीत मानवता फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.



## निवडक

### घरफोडीत दागिने लंपास

**नवीन पनवेल** : कोनगाव येथील घरात घरफोडी करून चोरांनी लाखोंचे दागिने लंपास केले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २८ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोनगाव मराठी शाळेमागे असलेल्या घराच्या दरवाजाचा कोयंडा तोडून चोरांनी आतमध्ये प्रवेश केला आणि दोन लाख २२ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

### गळ्यातील चेन हिसकावली

**नवीन पनवेल** : १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन गळ्यातून हिसकावून चोरटे पळून गेले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करीत आहेत. २९ जुलै रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास बारवई पुलाजवळ पुणे-मुंबई जुना हायवे येथे फिर्यादी उभे असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील चेन हिसकावून ते पळून गेले.

### दागिन्यांची चोरी

**पनवेल** : तळोजा परिसरात 'देवी नाराज झाली. तुमचे दागिने काढा,' असा बहाणा करून एका महिलेचे दागिने चोरण्यात आले. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडिता पेणधर रेल्वे स्थानकालगतच्या रस्त्याने पायी जाताना ही घटना घडली. यावेळी अनोळखी व्यक्ती महिलेचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाइल घेऊन पसार झाले.

# ऑनलाइन परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन

**नवी मुंबई : बातमीदार**

एमपीएससीच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याच्या निर्णयानंतर नॉर्मलायझेशन, तांत्रिक सुविधा आणि परीक्षा प्रक्रियेच्या विश्वासार्हतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सर्व प्रलंबित प्रक्रिया ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. तसेच कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही, अशी भूमिका आयोगाने स्पष्ट केल्याची माहिती भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी गुरुवारी दिली.

सीबीडी बेलापूर येथील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात आयोगाच्या अध्यक्षांसमवेत झालेल्या बैठकीनंतर महाडिक यांनी माध्यमांशी संवाद साधला. बैठकीला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना थेट आपल्या शंका व सूचना मांडण्याची संधी देण्यात आली. ऑनलाइन परीक्षा पद्धतीमुळे नॉर्मलायझेशन, सुरक्षित सर्व्हर, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले होते.

# पनवेलमध्ये गुंजला 'अंतर्नाद' | रसिक प्रेक्षकांचा प्रतिसाद

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कार्यक्रमाला शुभेच्छा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवारी (दि.३०) 'अंतर्नाद' या कलाकृतीचा प्रयोग मोठ्या उत्साहात झाला. मोरया थिएटर्सची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथे भेट देत शुभेच्छा दिल्या. त्यांचा सन्मान करण्यात आला.

अंतर्नाद या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात नाट्य, गीत, संगीत आणि नृत्य यांचा अप्रतिम संगम प्रेक्षकांना अनुभवायला मिळाला. अध्यात्म आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अनोखा मेळ साधणाऱ्या या कार्यक्रमाने उपस्थितांना एका वेगळ्याच भावविश्वात नेले. या कलाकृतीचे लेखन विनोद रत्ना यांनी केले असून संकल्पना व दिग्दर्शन मनोज डाळीम्बकर यांचे होते, तर या कार्यक्रमाची निर्मिती भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.

कार्यक्रमास सांस्कृतिक मंत्रालयाचे बाबासाहेब जगताप, भाजप सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अमोल खेर, आदित्य उपाध्याय आदी उपस्थित होते. पनवेलमधील नागरिक विशेषतः संगीतप्रेमींनी फडके नाट्यगृहात मोठी गर्दी केली होती. कलाकारांच्या बहारदार सादरीकरण आणि संगीतमय वातावरणाने संपूर्ण नाट्यगृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले. प्रेक्षकांनी सांस्कृतिक कार्य विभाग आणि कलाकारांचे कौतुक केले.

# रोहा शहरातील दमखाडीत गटार खचले; अनेक गाड्या पडल्या, सुदैवाने जीवितहानी नाही

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरातील दमखाडी येथील जयराम मार्केट समोरील गटार खचल्याने दुचाकी व रिक्षा खड्ड्यात गेल्या आहेत. ही घटना गुरुवारी रात्री ८च्या सुमारास घडली आहे.

सायंकाळी रिमझिम पाऊस पडत असताना रोहा शहरातील रोहा कोलाड मुख्य रस्त्याच्या लगत असलेल्या जयराम मार्केटसमोरील गटार रात्री आठच्या सुमारास खचले. या गटारावर असलेली एक रिक्षा व पाच बाईक या खड्ड्यात पडले आहेत. या ठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांनी ही वाहने बाहेर काढली. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच नगराध्यक्ष वनश्री शेडगे उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती, नगरसेवक यांनी पाहणी केली. यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी यावर त्वरित उपयोजना करण्याच्या सूचना नगरपरिषद प्रशासनास दिले आहेत. यावेळी त्वरित नगर परिषदेच्या वतीने कामाला सुरुवात करण्यात आली होती.

गटार खचल्याचे चित्र दिसतात रोहा कोलाड मार्गावरील रहिवाशी, रोहेकर नागरिकांनी यावेळी पाहण्यासाठी गर्दी केली होती. पोलिसांनी रहदारी व्यवस्थित केली.

**पावसाळ्याआधी रोहा शहरातील गटाराची कामे करण्यात आली आहेत. आताही शहरातील गटारांची सखोलतेने पाहणी करू अजूनही अशा पद्धतीचे गटारे निदर्शनास आल्यास नगरपरिषदेच्या वतीने कामे करण्यात येतील. या पडलेल्या गटाराचे काम ही लवकरच पूर्ण करण्यात येईल. तोपर्यंत नागरिकांनी या कामाच्या ठिकाणी येऊ नये.**

**–वनश्री शेडगे, नगराध्यक्ष, रोहा अष्टमी नगर परिषद**



# पूरग्रस्त अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड–जांभूळपाडा यांच्या वतीने पूरग्रस्त भागातील नागरिकांच्या आरोग्याची तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांची दखल घेत विविध उपक्रम राबविण्यात आले.

अलीकडील पुरामुळे जांभूळपाडा व हेदवली येथील अंगणवाड्यांमधील अनेक विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य नुकसानग्रस्त झाले होते. ही बाब लक्षात घेऊन दोन्ही अंगणवाड्यांतील विद्यार्थ्यांना नवीन शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या शिक्षणाचा प्रवास पुन्हा सुरळीत होण्यास मदत झाली आहे.



यासोबतच पूरानंतर साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावात धूर फवारणी करण्यात आली. तसेच नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध राहावे यासाठी मेडिक्लोरचेही वितरण करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरपंच पांडुरंग शेंडे, उपसरपंच अरुणा दळवी, सदस्य प्रमाकर खंडागळे, सुभमा वाघमारे, सुशील मालुसरे, धोंडी पवार, सविता बामगुडे, सदीश लोंडे, दीपिका साळुंखे, उमेश गौळ पवार, संतोष महादू पवार, मनीषा गुणाजी गोरे, ग्रामपंचायत अधिकारी सचिन बालाजी कॅंद्रे, लेखनिक ज्ञानेश्वर शंकर दळवी, विलास विनायक पिंपळे, तसेच शिपाई केशव यशवंत पिंपळे यांनी परिश्रम घेतले.

# फार्मर आयडीसाठी कृषी विभागाची विशेष मोहीम

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परीषद कृषी विभागाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत फार्मर आयडी संदर्भात खास चर्चा करण्यात आली. जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढले गेले पाहिजेत यासाठी विशेष मोहीम राबवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यात कृषी विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे आणि पुढील बैठकीपूर्वी हे लक्ष्य पूर्ण झाले पाहिजे अशा सूचना कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी सर्व अधिकारी कर्मचारी यांना दिल्या.




फार्मर आयडी हा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा असतो. त्यावर शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध लाभाच्या योजनांचा संबंध असतो. त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांनी यात जातीने लक्ष घालणे गरजेचे आहे, १५ ऑगस्ट पूर्वी हे काम पूर्ण झाले पाहिजे. त्यासाठी कामाचा रोजच्या रोज आढावा घेतला जाईल, असे वैकुंठ पाटील यांनी सांगितले. शेतकरी पीकविमा काढण्यात टाळाटाळ करीत असल्याबद्दल या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. यावर्षी केवळ १५०० हेक्टर क्षेत्रावरील विमा काढण्यात आला. ही आकडेवारी इतकी कमी का असा प्रश्न वैकुंठ पाटील यांनी उपस्थित केला. मात्र शेतकऱ्यांना मागील वर्षीचे विम्याचे पैसे अद्याप न मिळाल्याने शेतकरी त्यासाठी उत्सुक नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

कंपन्यांच्या सीएसआर फंडातून शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविण्याच्या मुद्यावर बैठकीत चर्चा झाली. पुढील बैठकांना कंपन्यांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्याच्या सूचना सभापतींनी दिल्या. सभापती वैकुंठ पाटील यांनी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी तालुका स्तरावर विशेष शिबीरे आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हयातील भातलावणीच्या सद्यस्थितीचा आढावा देखील या बैठकीत घेण्यात आला. जिल्हा परीषदेत कृषी विभाग अव्वल स्थानावर पोहोचला पाहिजे यासाठी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी झोकून काम करण्याचे आवाहन सभापती वैकुंठ पाटील यांनी केले.

यावेळी रायगड जिल्हा परीषद कृषी अधिकारी पवनकुमार नजन, कृषी समिती सदस्य ज्योती नागावकर, भस्मा बाळू, विलास शिंदे, नलिनी लोखंडे यांच्यासह तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांनी चर्चेत भाग घेतला.

पीक विमा योजनेला शेतकऱ्यांकडून मिळणारा अल्प प्रतिसाद पाहता आता जिल्हा परीषदेचा कृषी विभाग पुढे सरसावला आहे. त्यासाठी आवश्यक ती तरतूद देखील करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना भरावी लागणारी विमा हप्त्याची रक्कम भरण्याची तयारी जिल्हा परीषदेने केली आहे. परंतु विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत जवळ आल्याने फारशा शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार नाही. जर विमा हप्ता भरण्याची मुदत वाढवण्यात आली तर पीकविमा काढला जाईल, असे सभापती वैकुंठ पाटील यांनी स्पष्ट केले.

## रोहा ब्राह्मण मंडळातर्फे श्री धावीर नाम सप्ताहाचे आयोजन

**रोहा : प्रतिनिधी**

रोह्याचे आराध्य ग्रामदैवत असलेल्या श्री धावीर महाराजाचा नाम सप्ताह ब्राह्मण समाजातर्फे आषाढ वद्य पंचमी ते एकादशी या दरम्यान संपन्न होत असतो या वर्षी नाम सप्ताहाचे १२६ वे वर्ष असून ३ ऑगस्टपासून नाम साप्ताहाला प्रारंभ होत आहे. गावावर रोगराई किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे संकट येऊ नये याकरिता हा नाम सप्ताह करण्यात येतो.

या निमित्ताने सात दिवस श्री ओंकारेश्वर मंदिरामध्ये सुश्राव्य भजने, कीर्तन, व्याख्याने, प्रवचन, पंचपदी, काकड आरती, शेजारती आदी सेवा सुरु असतात व देवासमोरील झान्ज ७ दिवस २४ तास अव्याहतपणे सुरु असते.ब्राह्मण समाजातील अबालवृद्धाचा या मध्ये सहभाग असतो व लोकवर्गणीतून हा उत्सव साजरा करण्यात येतो.

# प्रसूतीदरम्यान नवजात बालकाच्या मृत्यूप्रकरणी कारवाई

## अलिबाग जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांवर गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग जिल्हा शासकीय रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान २०२२ मध्ये झालेल्या नवजात बालकाच्या मृत्यूप्रकरणी अलिबाग पोलिसांनी तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियल रविंद्र शेंडे यांच्याविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. मुंबईतील सर जे. जे. समूह रुग्णालयाच्या पाच वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथील सुष्मिता रुपेश काटले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १४ मे २०२२ रोजी पहाटे प्रसूती वेदना सुरू झाल्याने त्यांना अलिबाग जिल्हा रुग्णालयातील प्रसूती विभागात दाखल करण्यात आले होते. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, प्रसूतीदरम्यान वारंवार वैद्यकीय अधिकाऱ्यांना बोलावण्याची विनंती करण्यात आली. मात्र, संबंधित डॉक्टर कर्तव्यावर उपस्थित नसल्याने आवश्यक वैद्यकीय निर्णय वेळेत घेण्यात आला नाही. परिणामी, नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेनंतर अलिबाग पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करून चौकशी सुरू केली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपचारासंबंधीची कागदपत्रे मुंबई येथील सर जे. जे. समूह रुग्णालयाच्या तज्ज्ञ समितीकडे वैद्यकीय अभिप्रायासाठी पाठविण्यात आली होती. २७ जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेल्या पाच वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीच्या अहवालात, प्रसूतीच्या वेळी संबंधित वैद्यकीय अधिकारी कर्तव्यावर उपस्थित राहणे आवश्यक असताना त्या अनुपस्थित राहिल्याने आवश्यक उपचार वेळेवर मिळाले नाहीत आणि त्या निष्काळजीपणास जबाबदार असल्याचा निष्कर्ष नोंदवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

या अहवालाच्या आधारे आणि तक्रारदाराच्या निवेदनानुसार अलिबाग पोलिसांनी डॉ. प्रियल शेंडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, या प्रकरणातील आरोपांवर संबंधित डॉक्टरांची भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

# विद्यार्थ्यांनी गिरवले शेती अन् श्रमसंस्काराचे धडे



**पाली : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण जीवन, शेतीचे महत्त्व आणि श्रमसंस्कार यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे सोमवारी (ता. २७) भात लागवडीचा प्रत्यक्ष अनुभव देणारा नाविन्यपूर्ण उपक्रम अत्यंत उत्साहात राबविण्यात आला. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष कृतीची जोड देत राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

या उपक्रमांतर्गत पाच्छापूर गावातील प्रगतशील शेतकरी रघुनाथ जगताप यांच्या शेतामध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उतरून भात रोपांची लागवड केली. या वेळी रघुनाथ जगताप यांनी विद्यार्थ्यांना भात लागवडीची योग्य पद्धत, रोपांमधील योग्य अंतररचना आणि लागवडीतील विविध तांत्रिक बारकावे यांचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतः चिखलात उतरून लागवड करण्याचा आनंद लुटला. जगताप यांनी अत्यंत संयमाने आणि आपुलकीने विद्यार्थ्यांना शेतीचे मोल समजावून सांगितले. या प्रात्यक्षिक अनुभवातून विद्यार्थ्यांना कष्टाचे मूल्य, निसर्गाशी असणारे नाते आणि अन्नधान्य निर्मितीमागे असणारे शेतकऱ्यांचे अथक परिश्रम या बाबी प्रत्यक्ष शिकायला मिळाल्या. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा अनुभव अत्यंत आनंददायी व प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

मुख्याध्यापक दिपक माळी या वेळी म्हणाले की, पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, पर्यावरण संवर्धनाची भावना आणि शेतीविषयी आदर निर्माण होण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांना शेतात प्रत्यक्ष काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने रघुनाथ जगताप यांचे विशेष आभार मानण्यात आले. ग्रामीण संस्कृती, शेतीविषयीची आत्मीयता आणि अनुभवाधारित शिक्षण यांचा सुरेख संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाचे पालक, ग्रामस्थ आणि शिक्षणप्रेमींकडून विशेष कौतुक केले जात आहे.

# गुरुकुल अकॅडमीमध्ये विद्यार्थी परिषद निवडणूक

**महाड : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संचलित आमच्या शाळेत १८ जुलै २०२६ रोजी 'विद्यार्थी परिषद निवडणूक' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची मूल्ये, नेतृत्वगुण आणि जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी, हा या निवडणुकीमागील मुख्य उद्देश होता.

या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी हेड बॉय/गर्ल, डेप्युटी हेड बॉय/गर्ल, आरोग्य मंत्री, क्रीडा मंत्री, शिस्त मंत्री, ग्रंथालय, मीडिया आणि सांस्कृतिक मंत्री अशा विविध पदांसाठी सहभाग घेतला. उमेदवारांनी आपल्या सहकाऱ्यांसमोर आपापल्या कल्पना आणि योजना मांडून अत्यंत आदराने प्रचार केला. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक व्हावी यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व निवडणूक समितीच्या देखरेखीखाली गुप्त पद्धतीने मतदान घेण्यात आले.

मतमोजणीनंतर निकाल जाहीर करण्यात आले आणि निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींचे मुख्याध्यापकांनी कौतुक केले. नव्याने निवडून आलेल्या या बालनेत्यांनी आपल्या कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची आणि शाळा व विद्यार्थ्यांच्या हितासाठी काम करण्याची शपथ घेतली. ही निवडणूक विद्यार्थ्यांसाठी लोकशाही, जबाबदारी आणि संघभावनेचे महत्त्व शिकवणारा एक उत्तम अनुभव ठरली.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या देशाची लोकशाही भविष्यातही अखंड टिकून राहावी आणि समृद्ध व्हावी यासाठी मुलांना शालेय वयापासूनच लोकशाहीची मूलभूत तत्त्वे, अधिकार व कर्तव्यांची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. हीच जाणीव जपण्याचा प्रयत्न हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट नेहमी करत आला आहे.



# कुंभे धबधबा व आजूबाजूच्या एक किमी परिसरात प्रतिबंधात्मक मनाई आदेश

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पोलीस निरीक्षक माणगांव यांनी सादर केलेल्या पत्रान्वये माणगांव तालुक्यातील मौजे कुंभे केळगण घाट, कुंभे धरण, कुंभे बोगदा हे पावसाळी हंगामात पुणे तसेच मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे पर्यटनाचे आकर्षणाचे ठिकाण असून सदर ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते.भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ नुसार परिसरात पुढीलबाबींकरिता दि.०३ जुलै ते दि.२९ सप्टेंबर २०२६ या कालावधीकरिता माणगाव उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी केला आहे.

कुंभे धरण व धबधबा हे ठिकाण नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळे तेथे सुरक्षेच्यादृष्टीने कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे सन २०२४ मध्ये ट्रेकिंगकरीता आलेल्या ०५ पर्यटकांपैकी ०१ महिला पर्यटक सेल्फी काढण्याचे मोहापाई डोंगर कड्यावरुन पडून मयत झाली होती. तसेच कुंभे बोगदा व त्यापुढील धबधबा या ठिकाणी व्यवस्थेचा अभाव असल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते व कुंभे घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने दरड कोसळ्याची संभाव्यता असल्याने पर्यटकांची वित्त व जिवीत हानी होऊ नये याकरीता सुरक्षेच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने सदर ठिकाणी पर्यटकांना पर्यटनासाठी प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी केला आहे.

या दरम्यान पर्यटकांकडून परिसरामध्ये मद्यपान करणे किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे य उघडया जागेवर मद्य सेवन करणे. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धोकादायक वळणे, इ. ठिकाणी सेल्फी काढणे व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी तसेच धरण परिसरातील डोंगराच्या निमुळत्या टोकावर, उतरंडीवर जाऊन फोटोग्राफी करणे. वेगाने वाहणाऱ्या पाण्यात/खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे. धबधब्याच्या धोकादायकरित्या पडणाऱ्या पाण्याच्या झोताखाली बसणे. वाहने अतिवेगाने व बेदरकारपणे चालविणे, तसेच ओव्हरटेक करणे किंवा रहदारीच्या ठिकाणी वाहने थांबविणे अशा प्रकारची कृत्ये पर्यटकांकडून केली जातात.

याचबरोबर मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, गाडीमधील स्पिकर/ उफर वाजवून ध्वनी प्रदूषण निर्माण करणे, पर्यटनासाठी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, शिवाय खाद्यपदार्थाच्या काचेच्या व प्लॉस्टिकच्या बाटल्या, थर्माकोलचे व प्लॅस्टीकचे साहित्य उघडयावर इतरत्र फेकणे अशीही कृत्ये पर्यटकांकडून केली जातात. धरण/तलाव/धबधब्याच्या १ कि.मी. परिसरात दुचाकी/तीन चाकी/चार चाकी / सहा चाकी वाहनांनी प्रवेश करणे (अत्यावश्यक सेवा वगळून), या अशा प्रकारचे वर्तन करण्यास प्रशासनाने बंदी घातली आहे, याची नागरिकांनी गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन माणगाव उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी केले आहे.

# लव्हप्रीत सिंगने रौप्यपदक जिंकले

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ११०+ किलो वजनी गटाच्या वेटलिफ्टिंग प्रकारात भारताचा २८ वर्षीय वेटलिफ्टर लव्हप्रीत सिंग याने अतिशय रोमांचक लढतीत रौप्यपदक आपल्या नावावर केले आहे. विशेष म्हणजे, स्नॅच प्रकारात १७६ किलो वजनाचा राष्ट्रीय स्पर्धा विक्रम नोंदवत त्याने हे यश मिळवले आहे.

स्पर्धेच्या संपूर्ण कालावधीत लव्हप्रीत अत्यंत संतुलित आणि आक्रमक खेळ दाखवला. स्नॅचमध्ये १७६ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये २१२ किलो असे एकूण ३८८ किलो वजन उचलत त्याने दमदार प्रदर्शन केले. एका वेळेस लव्हप्रीतने न्यूझीलंडच्या डेव्हिड अँड्र्यू लिट्टीवर तब्बल १५ किलोची मोठी आघाडी घेतली होती, ज्यामुळे तो सुवर्णपदक जिंकेल असे स्पष्ट दिसत होते, मात्र न्यूझीलंडच्या खेळाडूने आपल्या शेवटच्या प्रयत्नांत जबरदस्त पुनरागमन करत एकूण ३८९ किलो वजन उचलले आणि अवघ्या एका किलोच्या फरकाने




लवप्रीतचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले.

यापूर्वी २०२२च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत लव्हप्रीतने कांस्यपदक जिंकले होते. या वेळी आपल्या पदकाचा रंग बदलत त्याने रौप्यपदकास गवसणी घातली आहे.

### सीमा कलिरामाना कांस्यपदकाची मानकरी

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या थाळीफेक स्पर्धेत भारताच्या २७ वर्षीय सीमा कलिरामाना हिने कांस्यपदक आपल्या नावावर केले आहे. विशेष म्हणजे, तीन वर्षांच्या मुलाची आई आणि शारीरिक शिक्षणामध्ये पीएचडीचे शिक्षण घेत असलेल्या सीमाने आपल्या जिद्दीच्या जोरावर हा ऐतिहासिक पराक्रम करून दाखवला आहे. या स्पर्धेची सुरुवात सीमासाठी फारशी चांगली झाली नाही. तिचा पहिला थ्रो गोळाफेकीच्या जागेच्या चौकटीला लागल्याने अपयशी ठरला, मात्र खचून न जाता सीमाने दुसऱ्या प्रयत्नात जबरदस्त पुनरागमन केले आणि ५७.३२ मीटर लांब थ्रो करत थेट तिसरे स्थान पटकावले. त्यानंतर आपल्या तिसऱ्या आणि शेवटच्या प्रयत्नात आणखी सुधारणा करत तिने ५८.६५ मीटरचा सर्वोत्तम थ्रो नोंदवला आणि कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

## नीरजसह तीन भारतीय भालाफेकपटू अंतिम फेरीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा २०२६च्या राष्ट्रकुल खेळांमधील पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पात्र ठरला आहे. नीरजसोबतच भारताचे रोहित यादव आणि यशवीर सिंग यांनीही पात्रता फेरीत उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली.

पात्रता फेरीत कोणीही ८४ मीटरचा स्वयंचलित पात्रतेचा निकष ओलांडला नाही. परिणामी अव्वल १२ खेळाडू अंतिम फेरीत पोहचले. नीरज चोप्राने ७९.६१ मीटरचा सर्वोत्तम भालाफेक करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आणि तो एकूण क्रमवारीत पाचव्या स्थानावर राहिला. भारताचा रोहित यादव ७८.३७ मीटरच्या भालाफेकीसह नवव्या स्थानावर राहिला आणि यशवीर सिंगने ७८.३६ मीटरच्या भालाफेकीसह अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेचा अंतिम सामना १ ऑगस्ट रोजी खेळला जाईल, जिथे नीरज चोप्रा २०१८च्या गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील आपल्या सुवर्णपदकाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न करेल. या स्पर्धेत भारताला पदकाच्या प्रबळ आशा आहेत, कारण भारताचे तीन खेळाडू अंतिम फेरीत पोहचले आहेत.

## स्टीफन फ्लेमिंग इंग्लंडच्या कसोटी प्रशिक्षकपदी

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी ब्रेंडन मॅक्युलमच्या जागी बोर्डाने स्टीफन फ्लेमिंग यांची कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकापदी नियुक्ती केली आहे तसेच बोर्डाने जो रूटला संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी दिली आहे.

स्टीफन फ्लेमिंग हे गेल्या १८ वर्षांपासून चेन्नई सुपर किंग्सचे मुख्य प्रशिक्षक आहेत. त्यांच्या नेतृत्वात संघाने १२ वेळा आयपीएलच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. त्यापैकी पाच वेळा संघाने विजेतेपद पटकावले आहे. त्यांनी वेगवेगळ्या टी-२० संघात मुख्य प्रशिक्षक म्हणूनही काम केले आहे. फ्लेमिंग हे जागतिक क्रिकेटमधील सर्वात यशस्वी प्रशिक्षकांपैकी एक मानले जातात तसेच ते पहिल्यांदाच एखाद्या आंतरराष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षकपद सांभाळणार आहेत.

## वनडे वर्ल्डकपसाठी मैदानांची घोषणा

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

आयसीसी पुरुष एकदिवसीय विश्वचषक २०२७ स्पर्धेच्या आयोजनासाठी दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथील १२ मैदानांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. जोहान्सबर्ग येथे आयोजित समारंभात ही मैदाने जाहीर केली गेली.



५० षटकांच्या या स्पर्धेत १४ संघ एकूण ५७ सामने खेळणार असून यंदा स्पर्धा नव्या तीन टप्प्यांच्या स्वरूपात होणार आहे. दक्षिण आफ्रिकेतील आठ शहरांमध्ये सामने खेळवले जाणार आहेत. यात जोहान्सबर्गमधील वाँडरर्स स्टेडियम, त्शवाने येथील सेंच्युरियन, केपटाऊन येथील न्यूलँड्स क्रिकेट ग्राउंड, डरबन येथील किंग्समीड क्रिकेट ग्राउंड, गेबेरहा येथील सेंट जॉर्ज पार्क, ब्लोमफॉन्टेन येथील मंगाऊंग ओव्हल, पार्ल येथील बोलंड पार्क आणि ईस्ट लंडन परिसरातील बफेलो पार्क या मैदानांचा समावेश आहे.

झिम्बाब्वेमध्ये हरारे येथील हरारे स्पोर्ट्स क्लब, बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लब आणि व्हिक्टोरिया फॉल्स येथील फाले मोसी-ओआ-तुन्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम येथे सामने खेळवले जातील, तर नामिबियाची राजधानी विंडहोक येथील नामिबिया क्रिकेट ग्राउंडवरही सामने होणार आहेत.

वनडे वर्ल्डकप तब्बल २४ वर्षांनंतर आफ्रिका खंडात परतत आहे. यापूर्वी २००३मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि केनिया यांनी संयुक्तपणे पुरुष विश्वचषकाचे आयोजन केले होते.

## अजिंक्यच्या निवृत्तीवर रोहित शर्माची भावूक पोस्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे याने गुरुवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. चाहत्यांकडून आणि माजी सहकाऱ्यांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दरम्यान, भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा यानेही अजिंक्यसाठी सोशल मीडियावर काळजाला भिडणारी पोस्ट केली आहे.

रोहित शर्माने अजिंक्य रहाणेसाठी एक्स प्लॅटफॉर्मवर पोस्ट करीत म्हटले की, आपण अनेक वर्षे एकाच ड्रेसिंग रूममध्ये एकत्र खेळलो आहोत आणि तुझ्या प्रत्येक यशामागे किती कठोर परिश्रम आहेत, हे मला चांगले माहीत आहे. तुझी बांधिलकी आणि व्यावसायिकता यांनी तुला नेहमीच इतरांपेक्षा वेगळे स्थान मिळवून दिले. तुझ्या शानदार कारकिर्दीसाठी मनःपूर्वक अभिनंदन. भविष्यातील वाटचालीसाठी तुला खूप खूप शुभेच्छा.




## ...म्हणून हॉकी संघाच्या जर्सीचा रंग बदलला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एफआयएच हॉकी विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर पुरुष आणि महिला राष्ट्रीय संघांच्या जर्सीचा पारंपरिक निळा रंग बदलून तो केशरी करण्यात आला आहे. या संदर्भात हॉकी इंडियाने एका सविस्तर निवेदनाद्वारे या मागील कारणांचे स्पष्टीकरण दिले आहे.

हॉकी इंडियाने स्पष्ट केले आहे की, जर्सीचा रंग बदलण्याचा निर्णय हा पूर्णपणे तांत्रिक कारणांवर आणि खेळाडू तसेच सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या शिफारशींवर आधारित होता. आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या नियमांनुसार सध्या निळ्या रंगाच्या सिंथेटिक खेळपट्ट्या हा जागतिक मानक रंग बनला आहे, मात्र या निळ्या खेळपट्ट्यांवर खेळाडूंचा पारंपरिक निळा गणवेश दृश्यात्मकरीत्या पूर्णपणे मिसळून जात असल्याचे निदर्शनास आले. या दृश्य साम्यामुळे मैदानावर खेळाडूंची स्पष्टता आणि दृश्यमानता यावर परिणाम होत होता, ज्यामुळे थेट खेळाच्या कामगिरीत अडथळा येत होता.

या तांत्रिक समस्येवर मात करण्यासाठी संघ व्यवस्थापनाने पर्यायी रंगांचा शोध सुरू केला. खेळाडू आणि प्रशिक्षक वर्गाने पिवळा किंवा केशरी यांसारखे रंग सुचवले. यावर सविस्तर विचारविनिमय केल्यानंतर अखेर केशरी रंग निश्चित करण्यात आला. हा रंग निवडण्यामागे केवळ तांत्रिक गरज नव्हती, तर या रंगाला आपल्या देशाच्या राष्ट्रध्वजात विशेष स्थान असून तो शौर्य, त्याग आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक मानला जातो.







## क्रिकेटपटूंच्या वयचोरीला लवकरच बसणार चाप!

### बीसीसीआय नवीन नियम लागू करण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अनेकदा किकेट खेळाडू खोटे वय सांगून आणि खोटी कागदपत्र तयार करून निवडकर्त्यांची फसवणूक करतात, पण आता हे रोखण्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) नवीन नियम आणण्याच्या प्रयत्नात आहे.

क्रिकबझ्च्या वृत्तानुसार बीसीसीआयने एका एजेन्सीसोबत करार केला आहे, जी वयाची पडताळणी करण्यासाठी शाळा आणि इतर संस्थांशी संपर्क करेल आणि त्यानंतर चौकशी करून खेळाडूंची जन्मतारीख वैध घोषित करेल. यादरम्यान आधार कार्ड, जन्म दाखला आणि शाळेतील इतर कागपत्रही तपासले जातील. यासह ही एजेन्सी ऑनलाईन तपासणी करेल. वयचोरी करणाऱ्या खेळांडूवर बीसीसीआयकडून बंदी घातली जाईल. यासह तो खेळाडू कुठल्याही वयोगटातील क्रिकेटमध्ये किंवा आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करू शकणार नाही, पण जो खेळाडू दोषी आढळून येईल, त्याला बाजू मांडण्याचीही संधी मिळणार आहे. जर स्वतःची बाजू मांडूनही एखादा खेळाडू दोषी आढळून आला, तर त्या खेळाडूवर कठोर कारवाई केली जाईल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com